महत्वाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र. लेखा/०५/ कावि/२२५६/२०१७
दिनांक :-२८/११/२०१७

**विषय :- आयकराबाबत सेमिनार आयोजित केलेले असून अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहणेबाबत...**

**संदर्भ :- NO.PN/DCIT(TDS)/SEMINAR/2017-18**
**DATE :- 23/11/2017**

**परिपत्रक,**

उपआयुक्त, आयकर पुणे यांचेकडील संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले असुन त्यानुसार आयकर (TDS) कायदयातील तरतुदी व कार्यपध्दती संदर्भात जागृती निर्माण होण्याचे दृष्टीने मनपातील अधिकारी/कर्मचा-यांसाठी कार्यशाळा आयोजित करणेकामी कळविलेले आहे. सदर कार्यशाळेमध्ये डॉ. अदित्य साओले, उपआयुक्त आयकर (TDS) पुणे तसेच ऍडव्होकेट श्री. शितल लोखंडे यांचे मार्गदर्शन होणार आहे.

सदरचे सेमिनार, ऑटो क्लस्टर, चिंचवड येथे दिनांक ५/१२/२०१७ रोजी सकाळी ११.०० ते २.०० या कालावधीत आयोजित केले आहे. तरी सर्व विभागाचे आहरण वितरण अधिकारी,लेखाधिकारी, लेखापाल, उपलेखापाल, मुख्य लिपिक आणि आस्थापना विषयक कामकाज करणारे कर्मचारी यांनी सदर कार्यशाळेला त्यांच्या TDS संदर्भातील लेखी अडीअडचणीसह न चुकता उपस्थित रहावे. सर्व विभागप्रमुखांनी तशा सुचना संबंधीतांना दयाव्यात.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रत :- १)आयुक्त कक्ष
२) अति. आयुक्त कक्ष
प्रति :- १) सर्व संबंधित विभाग प्रमुख